<u>रे.दि.मु.क्र.२७१/२०२३</u>
संजय रामचंद्र घोलप
वि.
**रमेश हंजारीमल ओसवाल वगैरे**

## <u>रे.दि.मु.नं. २७१/२०२३ मधील निशाणी १२ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र. १ याने याकामी "विनाकैफियत" झालेला हुकूम रद्द करुन कैफियत दाखल करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी याचे म्हणण्यानुसार, प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स प्राप्त होवुन सदर कामी हजर होवुन त्यांनी कैफियत दाखल करणेस मुदतीचा अर्ज दिलेला होता. कायदयानुसार प्रतिवादीने ९० दिवसांत दाव्यात कैफियत दिलेली नसल्याने प्रतिवादी याचे विरुद्ध कैफियत नाहीचा आदेश पारित झाला आहे. प्रतिवादी क्र. १ हे वयोमानानुसार आजारी असल्याने व त्यांचे वयोमानानुसार व कायदयातील अज्ञानामुळे व कागदपत्रांची माहिती नसल्यामुळे त्यांना कागदपत्रांची जुळवाजुळव करता आली नसल्याने त्यांना वकीलांना कागदपत्रे पुरविता आली नाही. त्यामुळे त्यांना पुढील तारखेची माहिती मिळु शकली नसल्याने त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. न्यायाचे दृष्टीने प्रतिवादीस कैफियत दाखल करणे आवश्यक असून त्यामुळे दाव्याचे कामकाज गुणावलोकनावर चालणार आहे. तसेच पुराव्यावर व साक्षीदार तसेच कागदोपत्री पुराव्यावरदेखील चालणार असुन न्यायदानास मदत होणार आहे. कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी, अशी विनंती

केली आहे.

०३. उलटपक्षी वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे **(नि.१४)** दाखल करुन, प्रतिवादीचा अर्ज व त्यातील मजकुर खोटा, लबाडीचा व काल्पनिक स्वरुपाचा असुन वादीस मान्य व कबुल नसल्याचे सांगितले आहे. तसेच प्रतिवादी याने तो आजारी असलेबाबत व कागदपत्रांची जुळवाजुळव करता आली नसलेबाबत केलेली तक्रार खोटी, लबाडीचा असलेने प्रतिवादीचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे.

०४. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादीने कैफियतीसोबत कोणतीही कागदपत्रे दाखल केली नसुन निव्वळ वादींना लवकर न्याय मिळु नये या हेतुने कोणत्याही संयुक्तीक कारणाविना जाणीवपुर्वक उशिरा कैफियत दाखल केली असलेने रद्द करणेस पात्र आहे. वादीचा दावा हा दावा मिळकत गहाण मुक्त करुन मागणीसाठी असलेने कैफियत स्विकारता दावा न्यायनिर्णीत केलेस त्यांचे काहीएक नुकसान होणार नसल्याने प्रतिवादीचा अर्ज रद्द करणेस पात्र आहे. प्रतिवादी यांचा अर्ज मंजुर करणेस झाल्यास र.रु. ३,०००/- कॉस्ट करुन सदर रक्कम वादीस नुकसानीदाखल देववावी असल्याचे सांगितले आहे.

०५. वादीने सदरचा दावा हा दावा मिळकत गहाण मुक्त करुन मागणीसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी यास समन्सची बजावणी होवुन ते दाव्याच्या कामी दि. १९.०६.२०२३ रोजी हजर झाले. त्यानंतर त्यांना कैफियत दाखल करणेस साधारणतः ५ महिन्यांचा विलंब झालेला आहे. परंतु सदरचा उशीर हा

नमुद कारणामुळे झाला असलेला दिसुन येतो.

०६. दावा गुणदोषावर चालविण्यासाठी व दाव्याच्या निर्णयासाठी प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. कैफियत दाखल करुन घेतले नाहीतर प्रतिवादीचे अपिरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन प्रतिवादीला त्याची बाजु मांडण्यासाठी कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे दाव्याच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादीवर खर्च लादून कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी याचा निशाणी १२ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ वर खर्च रक्कम रुपये ५००/–(पाचशे रुपये मात्र) लादून विनाकैफियत हुकुम रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादी याची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

४. खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत वादीला अदा न केल्यास सदरचा अर्ज रद्द समजावा.

Sd/–xx

स्थळ – कराड (पी. जी. शेलार)

दिनांक–२७/११/२०२३ ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड